# राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल २०१८

राष्ट्रीय सेवा योजनाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दारी येथे २२ डिसेंबर तो २८ डिसेंबर २०१८ या दरम्यान पार पडले.

दिनांक २२ डिसेंबर २०१८ रोजी कार्यक्रमाचे उदघाटन डॉ. प्रशांत देवरे संचालक मविप्र समाज नासिक यांच्या शुभहस्ते झाले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सचिन पिंगळे संचालक मविप्र समाज नासिक हे होते.

कार्यक्रमाचे उदघाटन होण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी अडीच तास श्रमदान केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. एन. बी. देसले सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर प्रा. उदय चौधरी सरानी आभार मानले. दुपारच्या सत्रात डॉ. पी व्ही रसाळ सरांचे राष्ट्रीय सेवा योजना व नेतृत्व विकास या विषयावर व्याख्यान झाले.

येत्या सात दिवसात विद्यार्थ्यांनी जलसंवर्धन व जलसंधारण करिता श्रमदान केले. एकूण २२५ विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले होते. त्यात आर्टस् व कॉमर्स महाविद्यालयाचे १००, केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे ७५ व सी एम सी एस चे ५० असे एकूण २२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

सर्वांनी मिळून १८४ चर खोदले. सर्व चरामध्ये एकूण २९४६४२ लिटर इतके पाणी अडवले जाईल. त्याचप्रमाणे डोंगर उतारावर बंधारादुरुस्तीचे काम सुद्धा या काळात करण्यात आले. दुरुस्तीमुळे या बंधाऱ्याची पाणी साठवण क्षमता अंदाजे १०५१००० लिटर ने वाढली. तसेच माध्यमिक शाळेकडे जाणाऱ्या ४०० मीटर रस्त्यावर मुरूम टाकून दुरुस्ती करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्रातील ८० झाडांना आळे करण्याचे उत्कृष्ठ काम स्वयंसेवकांनी केले. दुपारच्या सत्रात या सात दिवसात विविध व्याख्याने आयोजित केली होतो त्यामध्ये श्रीमती अनिता पगारे यांचे लैंगिक समानता, प्रा. अशोक सोनावणे यांचे स्वामी विवेकानंद आणि आजचा युवक, प्रा. एस .टी.घुले यांचे महात्मा गांधीजींचा जीवनप्रवास, प्रा. संदीप जगताप यांचेशिवशाही ते लोकशाही, श्री दिलीप स्वामी यांचे ग्रामीण विकासात युवकांचे योगदान या विषयावर व्याख्याने झाली.

सायंकाळच्या सत्रात विदयार्थ्यांनी विविध पथनाट्य सादर केली. त्यात प्रामुख्याने बेटी बचाव, बेटी पढाव, अंधश्रद्धा निर्मूलन व व्यसनमुक्ती या विषयावर पथनाट्य सादर करून सामाजिक प्रोबोधन केले.

दिनांक २८ डिसेंबर रोजी कार्यक्रमाच्या समारोपाला श्री पंडितराव पिंगळे माजी उपसभापती मविप्र समाज नासिक, श्री प्रल्हाद गडाख संचालक मविप्र समाज नासिक व श्री सचिन पिंगळे संचालक मविप्र समाज नाशिक हे उपस्थित होते. तसेच दरीग्रामपंचायत सरपंच सौ शोभा माळेकर, सर्व सदस्य व ग्रामसेवक श्री. विनोद वाघचौरे हेसुद्धा कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी उपस्थित होते. प्रा. डॉ.एस एन शिंदे सरानी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व त्यात त्यांनी सात दिवसात केल्या गेलेल्या कामाची सखोल माहिती दिली .सर्वांनी विद्यार्थ्यांच्या कामाचे कौतुक केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रा. सोपान तळेकर यांनी आभार मानले.

| | |
|---|---|
| प्रा. सोपान तळेकर | प्रा. एन. बी. देसले |
| कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य |


राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबिर
कला व वाणिज्य
महाविद्यालय




राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबिर


राष्ट्रीय सेवा योजना
विशेष श्रमसंस्कार शिबिर







# ग्रामीण भागातील लोकांची जीवनशैली समजून घ्या : पिंगळे

। पंचवटी । वार्ताहर ।



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील लोकांची जीवनशैली समजावून घेवून त्यांचं जीवन सुखकर करण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन मविप्र संस्थेचे संचालक सचिन पिंगळे यांनी केले .

नाशिक तालुक्यातील दरी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटना प्रसंगी ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते . प्रमुख पाहुणे म्हणुन संचालक प्रशांत देवरे प्राचार्य एन बी देसले , माजी प्राचार्य बी व्ही कापडणीस आदि मान्यवर उपस्थित होते. यावर्षी म. गांधी जयंतीला पूर्ण होणारे १५० वर्ष व १२५ वा युवा दिन महोत्सव आणि राष्ट्रीय सेवा योजनेला पूर्ण झालेली १५० वर्ष या तीनही प्रसंगाचे औचित्य साधून या शिबिरासाठी एका गावात तीन महाविद्यालयांची नियुक्ति विद्यापीठाने केली. यात मविप्र संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय मखमलाबाद , कर्मवीर बाबुराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक व सी.एम. सी.एस. महाविद्यालय नाशिक हे शिबिरात सहभागी झाले होते.

डॉ.प्रशांत देवरे यांनी आपल्याला यशस्वी होण्यासाठी अभ्यासाबरोबर संस्कारांची गरज असते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या संस्कार शिबिरातून मिळते असे सांगितले.

प्रास्ताविक कर्मवीर बाबुराव ठाकरे महाविद्यालयाचे प्राचार्य एन बी देसले यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सुभाष पिंगळे, सदस्य शंकरराव निवृत्ती पिंगळे , पंढरीनाथ पिंगळे माजी प्राचार्य बी व्ही कापडणीस, प्राचार्य डॉ. ए. पी. पाटील, सी. एम. सी.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एन.शिंदे, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य एन.बी.देसले व महाविद्यालयाचे सर्व विभागप्रमुख, तसेच दरीच्या सरपंच सौ. शोभा माळेकर, उपसरपंच राजेंद्र पिंगळे, ग्रामसेवक विनोद वाघचौरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गोरक्षनाथ पिंगळे, प्रा.उदय चौधरी, प्रा. सोपान तळेकर, तसेच सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय वेलजाळी, प्रा.वैशाली आहिरे, प्रा. प्रतीक्षा पिंगळे, प्रा. संतोष आढाव, प्रा. नलिनी बागुल, प्रा. वाय. पी. पाटील तसेच सर्व प्राध्यापक , प्राध्यापकेतर सेवक व विद्यार्थी मखमलाबाद महाविद्यालय, के.बी.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय, सी.एम.सी. एस. महाविद्यालय, ग्रामपंचायत सदस्य आदी ग्रामस्थ उपस्थित होते .


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

Online Tenders are invited from

| SN | E-Tender No. | |
|---|---|---|
| 1 | RP-CHP-B eT-78155 | Annual contra CHP-B, CSTF |
| 2 | RP-CHP-A eT-78432 | Annual contra A, C.S.T.P.S fi |
| 3 | RP-CHPA-VM eT-78868 | Annual contra vehicles at CS |
| 4 | RP-CHP-D eT-76258 | Work of repai for 1600/ 140( |

All the tender published in MAH

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून युवकांचा विकास : ॲड. पिंगळे

**। पंचवटी । वार्ताहर ।**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध श्रमसंस्कारशिबिरे घेतली जातात व त्यातूनच युवकांचा व समाजाचा विकास होतो असे प्रतिपादन मविप्र संस्थेचे माजी उपसभापती पंडितराव पिंगळे यांनी केले.

मविप्र संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालय मखमलाबाद, कर्मवीर बाबुराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालय, सी. एम. सी. एस. महाविद्यालय नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने दरी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समरोपाप्रसंगी बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी मविप्र माजी उपसभापती ॲड. पंडितराव पिंगळे, मविप्र संचालक सचिन पिंगळे, प्रल्हाद गडाख, स्कुल कमिटी पदाधिकारी संजय फडोळ, भास्कर पिंगळे, पी. के. पवार, सरपंच शोभा माळेकर, उपसरपंच राजेंद्र पिंगळे, ग्रामसेवक विनोद वाघचौरे, कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. पी. पाटील, सी. एम. सी.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एन.शिंदे, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य एन.बी.देसले, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. गोरक्षनाथ पिंगळे, कार्यक्रम अधिकारी प्रा.उदय चौधरी, प्रा. सोपान तळेकर, डॉ. दत्तात्रय वेलजाळी, प्रा. डॉ. एस. जे. कळभाने, प्रा.वैशाली आहिरे, प्रा. नलिनी बागुल, दर्शना मिंदे आदि उपस्थित होते. ॲड. पिंगळे म्हणाले की माणूस हा समाजातूनच शिकतो. राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवस हे आयुष्यातील न विसरता येणारे दिवस असतात. या सात दिवसात अनेक अनुभव अनुभवायला मिळतात. आजकाल विद्यार्थी वाचनाकडे दुर्लक्ष करत असून विद्यार्थ्यांनी आपली वाचन क्षमता जास्तीत जास्त वाढवली पाहिजे. वाचनातून ज्ञान मिळते. वाचना बरोबरच विचार करण्याची क्षमताही वाढायला हवी असेही त्यांनी सांगितले. यावेळी संचालक सचिन पिंगळे, प्रल्हाद गडाख आणि ग्रामसेवक विनोद वाघचौरे यांनी मनोगत व्यक्त केले. या सात दिवसांच्या शिबिरात तिन्ही महाविद्यालयाच्या २२५ स्वयंसेवकांनी या शिबिरात सहभाग घेतला. येथे १०÷२.५÷२.५ चे एकूण १८४ चर खोदण्यात आले. त्यात एका चराची पाणी साठवण्याची क्षमता १६०१ लिटर इतकी असून सर्व चरांमध्ये एकूण अंदाजे २९४६४२ लिटर इतके पाणी अडवले जाईल. त्याचप्रमाणे याच काळात डोंगर उतारावर असणाऱ्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यात आली. दुरुस्तीमुळे या बंधाऱ्यांची पाणी साठवण्याची क्षमता अंदाजे १०५१००० लिटर ने वाढली. तसेच माध्यमिक शाळेकडे जाणाऱ्या ४०० मीटर रस्त्यावर मुरूम टाकून रस्ता दुरुस्तीकरण करण्यात आले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील ८० झाडांना आळे करण्याचे उत्कृष्ट काम स्वयंसेवकांनी केले. तसेच स्वयंसेवकांनी त्यांना शिबिरात आलेले अनुभव सांगितले.स्वयंसेवकांनी इतिहास लेखन, जैवविविधता, सामाजिक सर्वेक्षण आदींच्या माध्यमातून गावकऱ्यांशी संवाद साधला. तसेच गावामध्ये स्वच्छता सुरक्षा अशा अनेक विषयांवर पथनाट्य सादर करून शिवार फेरी काढण्यात आली.



। नाशिक। राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमशिबिराच्या माध्यमातून दरी, ता. जि. नाशिक येथे बंधाऱ्याची दुरुस्ती करताना विद्यार्थी

विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात भ्रिभुण हत्या या विषयावर लघु नाटिका सादर केल्या. तसेच या सात दिवसामध्ये वेगवेगळ्या विषयांना अनुसरून रांगोळ्या काढण्यात आल्या.

याप्रसंगी सी.एम.सी.एस. चे प्राचार्य डॉ एस.एन.शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ.डी.बी. वेलजाळी यांनी स्वागत व सत्कार करून दिला. त्यांनतर या श्रमसंस्कार शिबिरात केलेल्या कामाचे अहवाल वाचन रासेयोच्या विभागिय समन्वयक प्रा.डॉ. गोरक्षनाथ पिंगळे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका आहेर व सागर गांगुर्डे यांनी केले. तर आभार प्रा. सोपान तळेकर यांनी मानले.

---

# श्रमसंस्कारातून युवकांचा विकास

## पंडितराव पिंगळे यांचे प्रतिपादन

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**



राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) माध्यमातुन विविध श्रमसंस्कार शिबिरे घेतली जातात. यातून युवकांचा व समाजाचा विकास होत आहे, असे मत मविप्रचे माजी उपसभापती पंडितराव पिंगळे यांनी व्यक्त केले.

आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, मखमलाबाद, केबीटी इंजिनीअरिंग कॉलेज आणि सीएमसीएस कॉलेज नाशिक यांच्यातर्फे दरी येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समरोपाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी मंचावर अध्यक्षस्थानी 'मविप्र'चे संचालक सचिन पिंगळे, प्रल्हाद गडाख, होरायझन ॲकेडमीचे अध्यक्ष संजय फडोळ, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य भास्कर पिंगळे, पी. के. पवार, सरपंच शोभा माळेकर, उपसरपंच राजेंद्र पिंगळे आदी उपस्थित होते.

तीनही कॉलेजेसच्या एकूण २२५ स्वयंसेवकांनी शिबिरात सहभाग घेतला. येथे एकुण १८४ चर खोदण्यात आले. प्रत्येक चराची पाणी साठवण्याची क्षमता १६०१ लिटर इतकी असुन सर्व चरांमध्ये एकुण सुमारे लाख ९४ हजार ६४२ लिटर इतके पाणी अडवले जाईल. डोंगर उतारावरील बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यात आली. यामुळे बंधाऱ्यांची पाणी साठवण क्षमता सुमारे १० लाख ५१ हजार लिटरने वाढली. माध्यमिक शाळेकडे जाणाऱ्या ४०० मीटर रस्त्यावर मुरुम टाकण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्रातील ८० झाडांना आळे केले.

स्वयंसेवकांनी इतिहास लेखन, जैवविविधता, सामाजिक सर्वेक्षण या माध्यमातून गावकऱ्यांशी संवाद साधला. स्वच्छता, सुरक्षा अशा अनेक विषयांवर पथनाट्य सादर काढण्यात आली.

# विचार करणारी पिढी निर्माण होण्याची गरज

## श्रमसंस्कार शिबिरात कवी संदीप जगताप यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत (एनएसएस) सामाजिक कार्याची जाणीव होणे आवश्यक आहे, यातून विचार करणारी पिढी निर्माण होईल, असे मत कवी प्रा. संदीप जगताप यांनी व्यक्त केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या आर्टस्, कॉमर्स कॉलेज मखमलाबाद, केबीटी इंजिनीअरिंग कॉलेज व सीएमसीएस कॉलेज नाशिक यांच्यातर्फे 'एनएसएस'चे विशेष श्रमसंस्कार शिबिर नाशिक तालुक्यातील दरी येथे सुरू आहे. या प्रसंगी प्रा. जगताप बोलत होते. मंचावर 'एनएसएस'चे विभागीय समन्वयक डॉ. गोरक्षनाथ पिंगळे, प्रा. उदय चौधरी, प्रा. सोपान तळेकर, प्रा. डॉ. दत्तात्रय वेलजाळी, प्रा. विक्रम पोटे, प्रा. नलिनी बागूल, प्रा. रुपाली वाकचौरे आदी उपस्थित होते.

गच्च नव्हे तर मन स्वच्छ करण्यासाठी 'एनएसएस'मध्ये येतात, असे प्रा. जगताप म्हणाले. प्रत्येकाने आनंदासोबतच आपली आयुष्याची दिशा ठरवणे आवश्यक आहे. आयुष्यामध्ये कोणीही गर्व बाळगू नका. त्यासाठी प्रत्येकाने सकारात्मक दृष्टी ठेवायला हवी. सामाजिक स्थितीत बदल घडवायचा असेल तर युवकांनी पुढे यायला हवे, असेही मत त्यांनी यावेळी मांडले. महेंद्र गुंजाळ व प्रतीक्षा यांनी सूत्रसंचालन केले.



### युवकांची भूमिका महत्त्वाची

युवकांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास होऊ शकतो. स्वतःच्या हिमतीवर गावात विधायक काम 'एनएसएस'मुळे घडू शकते, असे मत महसूल उपायुक्त दिलीप स्वामी यांनी व्यक्त केले. आयुष्यामध्ये जर काही करायचे असेल तर आपले ध्येय निश्चित करायला हवे. आपल्याला जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर वेळ, अभ्यास आणि आरोग्य यांचे नियोजन करा. प्रत्येकाने आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यायला हवे. तरुणांमध्ये व्यसनांचे वाढलेले प्रमाण चिंताजनक आहे. आयुष्यात वेळेचे अधिकाधिक चांगल्या रीतीने नियोजन करा, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. याप्रसंगी कल्पेश मालपुरे व दीक्षा पानसे यांनी सूत्रसंचालन केले.

# स्त्रियांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा: पगारे



पंचवटी । वार्ताहर ।

कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पुरुषांइतकीच स्त्रियांची भूमिका देखील महत्त्वाची आहे असे प्रतिपादन संगिनी महिला जागृती मंडळाच्या अध्यक्षा अनितानाई पगारे यांनी व्यक्त केले.

कला व वाणिज्य महाविद्यालय मखमलाबाद , कर्मवीर बाबुराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक व सी.एम.सी.एस. महाविद्यालय नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दरी येथे सुरु असून त्याठिकाणी लिंगभाव समानता या विषयावर त्या बोलत होत्या . यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ.गोरक्षनाथ पिंगळे, प्रा.उदय चौधरी, प्रा.सोपान तळेकर, प्रा.डॉ.दत्तात्रय वेलजाळी, प्रा. संतोष आढाव, प्रा.नलिनी बागुल, प्रा.वाय.के.पाटील, प्रा.वैशाली अहिरे, प्रा.श्रीमती प्रतीक्षा पिंगळे आदी उपस्थित होते.

पगारे म्हणाल्या की कुठलीही व्यक्ती हि जन्माला आल्यानंतर ती स्त्री किंवा पुरुष असे वर्गीकरण केले जाते. पुरुषाने केलेली कृती ही मर्दानगी म्हणून समजली जाते. तर स्त्रीकडे वेगळ्या दृष्टीने बघितले जाते. पुरुषांपेक्षा स्त्री ही कौटुंबिक जबाबदाऱ्या अतिशय समर्थपणे पार पाडत असते .घर सांभाळणे हे देखील एक कौशल्य असून ती अतिशय समर्थपणे घराची काळजी घेते . आज भारतातील स्त्रीया या दर ३४ मिनिटाला कौटुंबिक हिंसाचाराला कंटाळून आत्महत्या करत आहे. श्रमदान हे सर्वात श्रेष्ठ दान असून जोपर्यंत घामाचा थेंब खाली पडत नाही तोपर्यंत श्रमदान करत राहा असे सांगून प्रत्येक मुलीला स्वंरक्षणाचे धडे देणे गरजेचे आहे . स्त्री देखील पुरुषांप्रमाणेच सर्व जबाबदाऱ्या पार पाडू शकते असही त्यांनी सांगितले.

सकाळ

# स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा : अनिता पगारे

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसरूळ, ता. २५ : कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पुरुषांइतकीच स्त्रीची भूमिका देखील महत्त्वाची असल्याचे मत संगिनी महिला जागृती मंडळाच्या अध्यक्षा अनिता पगारे यांनी व्यक्त केले. मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालय, मखमलाबाद, कर्मवीर बाबूराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालय व सीएमसीएस महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दरी (ता. नाशिक) येथे झाले. त्या वेळी त्या 'लिंगभाव समानता' या विषयावर बोलत होत्या.

पुरुषाने केलेली कृती मर्दांगी समजली जाते. तर स्त्रीकडे वेगळ्या दृष्टीने बघितले जाते. पुरुषांपेक्षा स्त्री ही कौटुंबिक जबाबदाऱ्या अतिशय समर्थपणे पार पाडते. घर सांभाळणे हेदेखील स्त्रीचे कौशल्य आहे. आज भारतातील स्त्रिया दर ३४ मिनिटाला कौटुंबिक हिंसाचाराला कंटाळून आत्महत्या करत आहेत. प्रत्येक मुलीला स्वरक्षणाचे धडे देणे आवश्यक आहे. स्वयंपाक करतानादेखील महिलांना कौशल्य पणाला लावले लागते. आजही पुरुषप्रधान संस्कृतीच्या नावाखाली स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. स्त्रीदेखील पुरुषांप्रमाणेच सर्व जबाबदाऱ्या पार पाडू शकते, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. गोरक्षनाथ पिंगळे, प्रा. उदय चौधरी, प्रा. सोपान तळेकर, प्रा. डॉ. दत्तात्रय वेलजाळी, प्रा. संतोष आढाव, प्रा. नलिनी बागूल, प्रा. वाय. के. पाटील, प्रा. वैशाली अहिरे, प्रा. प्रतीक्षा पिंगळे आदी उपस्थित होते.

Nashik, Nashik-Today
26/12/2018 Page No. 5

# राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार : प्रा घुले

। पंचवटी । वार्ताहर ।

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होतात असे प्रतिपादन स्वयंसेवकांना व्यासपीठ उपलब्ध करून देते तसेच कर्तृत्व मातृत्व आणि नेतृत्व असे गुण राष्ट्रीय सेवा योजनेमुळे शिकण्यास मिळतात प्रा.एस.टी. घुले यांनी व्यक्त केले.

कला व वाणिज्य महाविद्यालय मखमलाबाद , कर्मवीर बाबुराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक व सी.एम.सी.एस. महाविद्यालय नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दरी ता.जि. नाशिक येथे सुरु असलेल्या याप्रसंगी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना बोलत होते . व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ.गोरक्षनाथ पिंगळे, प्रा.उदय चौधरी, प्रा.सोपान तळेकर, प्रा.डॉ.दत्तात्रय वेलजाळी, प्रा. संतोष आढाव, प्रा.नलिनी बागुल आदी उपस्थित होते. त्यांनतर पुढे ते म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना चागल्या प्रकारे व्यासपीठ उपलब्ध करून देते . त्याचप्रमाणे कर्तुत्व, मातृत्व आणि नेतृत्व असे गुणही स्वयंसेवकांमधे निर्माण होतात. जीवनात पूर्ण यश संपादन करायचे असेल तर नकारात्मक विचारांऐवजी सकारात्मक विचार आचरणात आणावे आयुष्य चांगले घडवायचे चांगल्या मित्रांचा सहवास ठेवायला पाहिजे.

जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास असणे आवश्यक असून मोत्यासारखे चमकण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना , गोर गरीबांना मदत करायला हवी. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे जीवनात परिवर्तन होत असते असे सांगून या शिबिराच्या माध्यमातून आयुष्यभराची शिदोरी मिळत असते असे सांगितले .



नागरिकांनी केली आहे.दोन महिन्यांपूर्वी गॅरेज चालकाचा अपघाती मृत्यू विद्यालय असून मोठ्या संख्येने नागरिकांची मागणी आहे.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून नेतृत्व विकसित होते : प्राचार्य डॉ. पी.व्ही. रसाळ

। पंचवटी । वार्ताहर।

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित होत असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. पी.व्ही.रसाळ यांनी केले .

दरी येथे सुरु असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरास त्यांनी भेट दिली त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.पी.पाटील होते व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ.गोरक्षनाथ पिंगळे, प्रा.उदय चौधरी, प्रा.सोपान तळेकर, प्रा.डॉ.दत्तात्रय वेलजाळी, प्रा. संतोष आढाव, प्रा.नलिनी बागुल, प्रा.वाय. के.पाटील, प्रा.वैशाली अहिरे, प्रा.श्रीमती प्रतीक्षा पिंगळे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.रसाळ म्हणाले की अन्नाचा कण आणि आनंदाचा क्षण कधीही वाया घालवू नये. श्रमनिष्ठा हे पवित्र व्रत असून युवकांनी ते जोपासले पाहिजे.सूक्ष्म निरीक्षण केल्याने माणूस मोठा होतो. या देशातील प्रत्येक तरुण हि या देशाची संपत्ती आहे.

आपल्याला दिलेलं काम हलकं असलं तरी त्याच मूल्य खूप मोठ असून प्रत्येकाने दृष्टी चांगली ठेवली पाहिजे तर दृष्टीमध्येच नवनिर्मिती असते असेही ते म्हणाले. जीवन जगत असतांना एकमेकांवर खूप प्रेम करा . जीवनामध्ये सगळ्यात जास्त प्रेम हे आई मुलावर करत असते. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे तरुण वर्ग घडला घडला जातो. प्रत्येकाने सकारात्मक विचार करायला हवा. चौकटीच्या बाहेर जाऊन जीवन जगायला हवे. शिक्षण हे उपजीविकेचे साधन नसून जीविकेचे साधन आहे असेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन ममता सूर्यवंशी आणि निलम शिंदे यांनी केले.